**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार, दिनांक १० ऑगस्ट २०२४**

## ठळक बातम्या

1. **केंद्रीय मंत्रिमंडळाद्वारे मंजूर जळगाव -जालना रेल्वे मार्ग पुढील चार ते पाच वर्षात पूर्ण होणार: केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती.**
2. **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आरक्षणाबाबत केलेल्या घटनात्मक तरतुदीं कायम ठेवण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळ कटिबद्ध: केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचे प्रतिपादन.**
3. **नवीन कर प्रणालीबाबत लोकांना साक्षर करण्यासाठीसीएंनी कार्य करावे - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे 'आयसीएआय'च्या विदर्भ कॉन्क्लेवच्या उद्घाटनप्रसंगी आवाहन.**
4. **ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजारानं मुंबईत निधन.**

****

अश्विनी वैष्णव पत्रकार परिषद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार-विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या २४ हजार६५७ कोटी रुपयांच्या आठ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. महाराष्ट्रासह ओदिशा, आंध्र प्रदेश, झारखंड, बिहार, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांमधल्या १४ जिल्ह्यांमध्ये हे प्रकल्प राबवण्यात येणार असल्याचं केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बैठकीनंतर प्रसार माध्यमांना नवी दिल्लीत सांगितलं. दरम्यान, आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून मुंबई, नागपूर, नांदेड, भुसावळ सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापकांच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रातल्या जालना - जळगाव ब्रॉडगेज रेल्वेमार्गाबद्दल माहिती दिली. या मार्गामुळे युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात समावेश असणाऱ्या अजिंठा लेण्यांकडे जाणं सोयीचं होणार आहे. तसंच विदर्भ आणि मराठवाडा भागासाठीही हा मार्ग फायदेशीर ठरणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. मराठवाड्याच्या दृष्टीने किनारी भागाला या रेल्वे मार्गामुळे ॲक्सेस मिळणार असून या भागातील कृषीमाल तसेच इतर वस्तूंची मालवाहतूक आता किनारपट्टी भागात सहजरीत्या होणे शक्य आहे. येत्या चार ते पाच वर्षात हा प्रकल्प पूर्ण होणार असून यासाठी सुमारे 7,106 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रकल्पामध्ये 23 पुर्णांक 5 किमी अश्या सर्वात मोठ्या लांबीचा टनेल - भुयारी मार्ग प्रस्तावित

आहे .हा रेल्वे प्रकल्प पूर्ण करताना वारसा स्थळाला कुठलीही इजा पोचणार नाही याची देखील काळजी रेल्वे प्रशासन घेईल असेही वैष्णव यांनी यावेळी स्पष्ट केलं.

मध्य रेल्वे  पत्रकार परिषद

मध्य रेल्वेच्या अजनी रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकास अंतर्गत पुढील 3 महिने अजनी येथील प्लॅटफॉर्म क्रमांक 3 हा पुनर्विकासाच्या  कामासाठी बंद ठेवला जाणार आहे .या कामासाठी अजनी रेल्वे स्टेशन वरून काही गाड्यांना थांबा रद्द करावा लागणार असून काही रेल्वे या नागपूर स्थानकावरून चालवल्या जाणाऱ्या असल्याची माहिती  मध्य रेल्वे नागपूर विभागाचे विभागीय व्यवस्थापक मनिष अग्रवाल यांनी आज नागपुरात पत्रकार परिषदेत दिली. नागपूर विभागातच रेल्वे ट्रॅक नवीन लाईन टाकण्याचे काम चालू असल्यामुळे नागरिकांनी ट्रॅकवर ओलांडणे टाळावे अस आवाहन  देखील त्यांनी केलं . अजनी येथील पुनर्विकासाच्या कामामुळे अजनी पुणे ही गाडी नागपूर स्थानकावरून चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे अजनी अमरावती ही इंटरसिटी एक्सप्रेस प्लॅटफॉर्मच्या कमतरतेमुळे रद्द करण्याच्या पर्यायावर सुद्धा विचार चालू असल्याचे अग्रवाल यांनी स्पष्ट केलं.

क्रिमी लेयर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत अनुसुचित जाती जमाती आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्णयाबाबत चर्चा झाली. हे आरक्षण संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या  संविधानातल्या तरतुदींनुसारच असावं, अशी सरकारची भूमिका असल्याचं, केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. संविधानात SC आणि ST च्या आरक्षणात क्रिमी लेयरची तरतूद नाही  असही वैष्णव यांनी स्पष्ट केल. अश्विनी वैष्णव म्हणाले की -------

***एनडीए सरकार बाबासाहेब आंबेडकरजी के बनाये सविधान के प्रावधानों के प्रति प्रतिबध्द है, संकल्पबद्द है, बाबासाहेब आंबेडकरजी के संविधान के अनुसार SC और ST के रिजर्वेशन में क्रीमीलेयर का कोई प्रावधान नहीं है । कैबिनेट का सुविचारिन मत है वेल थॉट थ्रू डिसीजन है की बाबासाहेब आंबेडकर क संविधान के अनुसार ही SC और ST का रिजर्वेशन की व्यवस्था होनी चाहिए ।***

हत्तीरोग

देशातून हत्तीरोग निर्मूलनाच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जात आहे या रोगाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टिकोनातून हत्तीरोग प्रतिबंधात्मक गोळ्यांच सेवन प्रत्येकांनी करा असं आवाहन केंद्रीय आयुष कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज बुलढाणा इथं केले. हत्तीरोगाच्या दुरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेचे उद्घाटन लॉन्च इव्हेंट दूरदृष्य प्रणालीद्वारे आज 10 ऑगस्टला केंद्रीय आयुष आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते झाले . मंत्री म्हणाले की हत्तीरोग हा आजार कायमस्वरूपी असल्याने त्यांना 45 टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र द्यावे जेणेकरून त्यांना अपंगत्वाचे इतर लाभ सुद्धा मिळू शकतील .. त्या दृष्टिकोनातून पहिलं 45% अपंगत्वाचे प्रमाणपत्र बुलढाणा येथे मंत्री महोदयांच्या हस्ते संबंधित हातीरोगग्रस्त महिलेला आज देण्यात आले.

वैनगंगा-नळगंगा

वैनगंगा-नळगंगा पाठोपाठ आता नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला सुद्धा राज्यपाल महोदयांनी मंजुरी दिली आहे. आपण राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचा अतिशय मनापासून आभारी आहे असं राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ,म्हंटलं आहे. या योजनेतून पश्चिमी वाहिनी नार-पार-गिरणा या नदीखोऱ्यातून 10.64 TMC पाणीवापर प्रस्तावित असून त्याचा लाभ नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील 49,516 हेक्टर क्षेत्राला होणार आहे. सुमारे 7015 कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. राज्याच्या जलसमृद्धीच्या दृष्टीने हे आणखी एक ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे असं त्यांनी सांगितलं

राष्ट्रीय हातमाग दिन पुरस्कार

आपल्या पिढ्यानपिढ्यापासून चालत आलेल्या कलेला जीवंत ठेवण्यासमवेत त्यात आपल्या कौशल्यातून भर टाकणाऱ्या हातमाग विणकरांचे योगदान अनेक पुरस्कारांपेक्षाही मोठे आहे. वयाच्या साठ वर्षापर्यंत कार्यरत असलेल्या हातमाग विणकरांना त्यांच्या योगदानाप्रती वार्धक्यातील शिदोरी म्हणून पेंशन देण्याचा लवकरच निर्णय आम्ही घेत असल्याचे सूतोवाच वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल केले. राष्ट्रीय हातमागदिनानिमित्त सदर इथल्या पोलिस ठाण्याच्या मागील नियोजन सभागृहात आयोजित राज्यस्तरीय हातमाग विणकर स्पर्धेतील बक्षीस वितरण सभारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमात रेशीम संचालनालयाच्या संकेतस्थळाचे उद्घाटनही करण्यात आले. यावेळी वस्त्रोद्योग आयुक्त अविश्यांत

पंडा, रेशीम संचालनालयाच्या संचालिका वसुमना पंत व मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगीराष्ट्रीय हातमाग कापड स्पर्धेतीलविजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. वॉल-हँगीग (संत कबीर) या प्रकारात सोलापूर येथील राजेंद्र सुदर्शन अंगम यांनी 50 हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले.

वस्तू व सेवा कर

वस्तू व सेवा कर रचनेमुळे (जीएसटी) देशात अनेक सकारात्मक बदल झाले. गत सात वर्षात देशाच्या करामध्ये दुपटीपेक्षा वाढ झाली. यानुरूप नवीन कायदे आले. कर विषयक कायदे, आर्थिक जबाबदारी याविषयी जनसामान्यांना साक्षर करुन सर्वांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी चार्टर्ड अकाउंट्सनी (सीए)नी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे केले. 'द इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) नागपूर शाखेच्यावतीने सेंटर पॉइंट हॉटेलमध्ये आयोजित दोन दिवसीय विदर्भ कॉन्क्लेवचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. आयसीएआयच्या नागपूर शाखेचे प्रमुख अक्षय गुल्हाने यांच्यासह वरिष्ठ पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमवीर सिंग यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर भाजप नेते तसेच तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना अटक करण्यासाठी खोटे आरोप अधिकाऱ्यांमार्फत करण्यासाठी आपल्यावर दबाव आणल्याचा खुलासा केला .यावर नागपुरात प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की परमबीर सिंग यांनी भाजपचे नेते आणि स्वतः मला अटक करण्याच्या ज्या बाबी समोर आणल्या आहेत त्यात तथ्य आहेत .मला आणि इतर भाजपा नेत्याला अटक करण्याचा प्रयत्न तसंच आम्हाला खोट्या केसेस मध्ये अडकवण्याचे षडयंत्र तत्कालीन सरकारने आखले पण वेळीच भाजपने त्यांचा पर्दाफाश केला असं फडणवीस यांनी नमूद केलं. या खोट्या आरोप लावण्याबाबतचे व्हिडिओ पुरावे सुद्धा केंद्रीय अन्वेषण विभागाला आम्ही सादर केल्याचं त्यांनी सांगितलं .भाजप नेते प्रवीण दरेकर गिरीश महाजन यांना अटक करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी काही अधिकाऱ्यांना सांगितलं परंतु काही चांगले अधिकाऱ्यांनी अशा खोट्या केसेस दाखल करण्याला नकार दिला असं देखील फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केलं.

आंदोलन

वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणी करिता आज अर्थात 10 ऑगस्ट रोजी क्रांती दिनाच्या पाडव्याला विदर्भ राज्य आंदोलन समिती द्वारे नागपुरातील यशवंत स्टेडियम मधुन लॉंग मार्च काढण्यात आला. हजारो विदर्भवादी विधान भवन नागपूर इथं स्वतंत्र विदर्भ राज्याच्या ध्वज फडकावून 'विदर्भ राज्य निर्माण करा' ची चेतावणी देणार होते. मात्र टेकडी गणेश मंदीर जवळ बर्डी पोलिसांनी विदर्भ राज्य आंदोलन समितीचे ॲड. वामनराव चटप, प्रकाश पोहरे, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, रंजनाताई मामर्डे, अरुण केदार, मुकेश मासुरकर व अनेक कार्यकर्तांना ताब्यत घेतले.

विजय कदम निधन

ज्येष्ठ अभिनेते विजय कदम यांचं आज निधन झालं. ते ६७ वर्षाचे होते. त्यांनी मुंबई इथ अंधेरीच्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. विजय कदम यांच्यावर कर्करोगावर उपचार सुरु होते. विजय कदम यांनी मराठी चित्रपट,मालिका आणि रंगभूमीवर आपल्या अभिनयाची छाप उमटवली. विजय कदम यांनी लहान असताना 'राजा भिकारी माझी टोपी चोरली' या बाल नाटकात हवालदाराची भूमिका करून रंगभूमीवर पदार्पण केलं. त्यांनी 'रथचक्र','घरटे आमुचे छान', 'वासुदेव सांगती' 'टुरटूर' आदी नाटकं केली. विजय कदम यांनी 'राजानं वाजवला बाजा', 'गोळाबेरीज', 'वासुदेव बळवंत फडके','रेवती','देखणी बायको नाम्याची','आनंदी आनंद', 'इरसाल कार्टी', 'लावू का लाथ', 'मेनका उर्वशी','कोकणस्थ' आदी चित्रपटात काम केलं. विजय कदम यांनी गोटया, दामिनी,पार्टनर,सोंगाडया बाज्या,इंद्रधनुष्य, घडलयं बिघडलयं,ती परत आलीय अशा अनेक मराठी मालिका आणि श्रीमान श्रीमती, मिसेस माधुरी दिक्षित, अफलातून, घर एक मंदिर या हिंदी मालिकांमध्येही अभिनय केला होता. कदम यांच्या निधनाने एक अष्टपैलू अभिनेता आपल्यातून निघून गेले. त्यांचे निघून जाणे मराठी चित्रपट विश्वाची मोठी हानी आहे.आपण त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतोअसा संदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

हवामान

पूर्व विदर्भातल्या नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमानाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला असून नागपुरात सकाळपासूनच ढगाळ वातावरण आहे. उद्या देखील नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहण्याची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात येत्या 14 तारखेपर्यंत हवामान सामान्य राहणार असून कुठल्याही इशारा हवामान खात्यातर्फे देण्यात आलेला नाही.

******